## प्रकरण तिसरे

## कृष्णशिष्य ज्ञानी श्रोता अर्जुन

# प्रकरण तिसरे

## कृष्णशिष्य ज्ञानी श्रोता अर्जुन ---

### प्रास्ताविक --

"हस्तिनापूरच्या पाण्डुराजाची पत्नी असणाऱ्या कुंतीच्या चार पुत्रांपैकी तृतीयपुत्र .कुंतीला दुर्वास ऋषींनी दिलेल्या इंद्रमंत्राच्या प्रभावाने हा जन्मला.यामुळे प्रत्यक्ष इंद्रापासूनच हा उत्पन्न झाला असा निर्देश काही पुराणात आढळतो. (मार्क ५.२२ ) हा नराचा आवतार असल्याचा निर्देश महाभारतात आढळतो ( अ.आ.११ )

परंपरागत भारतीय साहित्यातील रणशूर धनुर्धराची मूर्ती डोळ्यांसमोर ठेवून व्यासांनी अर्जुनाचे व्यक्तिचित्र महाभारतामध्ये रंगविलेले आहे असे सकृतदर्शनी भासते. तथापि या धनुर्धराच्या जीवनातील परमोत्कर्षबिंदू जे भारतीय युध्द तेथे स्वकीयाशी युध्द करावे की नाही असा एक नवा प्रश्न अर्जुनासमोर उत्पन्न करुन त्यांच्या व्यक्तिरेखाला अगदी नवी कलाटणी व्यासांनी दिलेली आहे.

धनुर्धराचे सारे अस्तित्व युध्दावर अवलंबून असल्याने ही विशिष्ट भूमिका भारतीय युध्द पावेतो अर्जुनाने अचूकपणे सांभाळली होती. परंतु आजवरच्या साऱ्या युध्दाहून वेगळ्या असणाऱ्या कुरुयुध्दाच्यावेळी हा गोंधळला, जय मिळवायचा तो स्वकीयांना मारुन आणि राज्य प्राप्त करावयाचे ते रक्तामासाच्या बांधवांना कंठस्नान घालून अशी समस्या धनुर्धर अर्जुनासमोर उभी राहिली.तेव्हा याचे मन गोंधळून गेले ,राज्य जिंकण्याचा याचा उन्माद गळून पडला".[१]

कौरवांनी द्यूताचे निमित्त करुन पांडवाना कफल्लक केले. वनवासात व अज्ञातवासात धाडून शारीरिक व मानसिक पिळवणूक केलेली आहे. अज्ञातवासानंतर

पांडव परत आले. त्यानंतर पांडवानी आपल्या न्यायहक्काची मागणी दुर्योधनाकडे केली. हस्तिनापूरच्या अर्ध्याराजाचे पांडव हे मालक असूनही दुर्योधनाने कणभरही जमीन देणार नाही असे स्पष्ट सांगितले. कौरवानी पांडवांचा अनन्वीत छळ केलेला होता. त्यामुळे पांडवाच्या मनात कौरवांविषयी सुडाची भावना धगधगत होती, त्यातच दुर्योधनाने न्यायहक्क नाकारुन आगीत रॉकेल ओतल्यासारखा प्रकार केला. यामुळे भांडण होण्याची शक्यता निर्माण झाली. पांडवानी शांततेच्या मार्गाचे प्रस्ताव मांडूनही पेचप्रसंग कायम राहिला. शेवटचा प्रयत्न म्हणून कृष्णानी शिष्टाई केली. शिष्टाईच्यावेळी दुर्योधनाने कृष्णाचा अपमान केला. दुर्योधनाच्या तामसी, आग्रही व सत्तालोलुप स्वभावामुळे युध्द अनिवार्य ठरले. सैन्याची जमवाजमव करुन कौरव व पांडवांचे सैन्य कुरुक्षेत्रावर पोचले.

अर्जुनाचा सारथी श्रीकृष्ण तर कर्णाचा सारथी शल्य. शल्य कर्णाला मर्मभेदक व कठोर बोलत होता त्यामुळे कर्णाची एकाग्रता भंग पावत असे अशाच अस्वस्थ मन:स्थितीत कर्ण अर्जुनाबरोबर लढत असे. दुसरीकडे कृष्णाचे सारथ्य अद्वितीय आहे. श्रीकृष्ण अर्जुनाची युध्द प्रेरणा आहे. अर्जुन बुध्दिमान व नरपुरुष म्हणून विख्यात आहे. अर्जुनाचे धनुर्विद्येतील कौशल्य वादातीत आहे. अर्जुन द्रोणा- - चार्यांचा आवडता विद्यार्थी होता. सचोटीने, परिश्रमपूर्वक आणि लक्षापूर्वक अर्जुन अध्ययन आणि सराव करीत होता. अर्जुनाचे लक्ष्य अचूक असे. अर्जुनाची एकाग्रता अजब आहे. द्रोणाचार्यासारख्या कुशाग्र बुध्दीच्या शिक्षकांच्या आदरास आणि प्रेमास पात्र होण्याचे भाग्य अर्जुनाला लाभले. आणि शिष्याच्या कल्याणार्थ जगाच्या टीकेचे भक्ष्य होणारी गुरुद्रोण ही एक अजब वल्ली होऊन गेली. अर्जुनाची एकाग्रता विलक्षण होती. अंधारातही सराव करुन अचूक वेध घेत असे. यामुळेच युध्दाचा कोलाहल माजला असताही श्रीकृष्णाने केलेला उपदेश ग्रहण करुन श्रीकृष्णाला प्रतिप्रश्न विचारीत होता. अर्जुनाच्या मनाची एकाग्रता व श्रीकृष्णाच्या वाणीची रसाळता यामुळे दोघांचे नाते उद्बोधक वाटते.

गीतेतील अर्जुन सर्वसामान्यांचा प्रातिनिधिक नमुना आहे. सर्वसामान्यांना

पडणारे जीवनविषयक प्रश्न अर्जुनाला पडलेले आहेत. सर्वसामान्याचा प्रतिनिधी असणाऱ्या अर्जुनाच्या भावभावनांचे काव्यात्मक असे चित्रण करुन ज्ञानदेवांनी गीतेतील अर्जुनाला ज्ञानेश्वरीत सजीव केलेला आहे.

जीवन विषयक व्यापक विचार करणारा योध्दा अर्जुन --

ऐन युध्दाच्या धामधुमीत अर्जुनाने श्रीकृष्णाला जे प्रश्न विचारलेले आहेत यावरुन अर्जुन आपल्या जीवनाविषयी व्यापक विचार करणारा योध्दा होता असे चित्र निर्माण झालेले आहे. एकूणच मानवी जीवनाचा व्यापकपणे विचार करणाऱ्या माणसाला अनेक प्रश्न पडतात. हा माणूस स्वत:पुरता कधीच विचार करीत नाही.अर्जुनाच्या मनात भावना व कर्तव्य यांचा जो झगडा चालू होता त्याच्या निवारणार्थ अर्जुन श्रीकृष्णाला प्रश्न विचारीत आहे. प्रश्नांच्या उत्तराची पूर्तता अधिकारी व्यक्तीकडून करुन घेण्याचे अर्जुनाचे आत्मभान ज्ञानदेवांनी चित्रित केलेले आहे. कोणती कृती करणे योग्य आहे हे विचार करुनही समजत नाही तेव्हा अर्जुन श्रीकृष्णाला म्हणतो.

तरी उचित काय आम्हा । जे व्यभिचरेना धर्मा ।
ते झडकरी पुरुषोत्तमा । सांगे आता ( २ । ६३ )

सर्वसामान्यांच्या सांसारिक आणि आध्यात्मिक जीवनामध्ये निर्माण होणाऱ्या शंकाचे निरसन ज्ञानदेवांनी अर्जुनाच्या माध्यमातून केले आहे, यामुळे अर्जुन हा जीवन विषयक व्यापक विचार करणारा योध्दा अशी प्रतिमा निर्माण झालेली आहे.

कौरव-पांडवांच्याकडील सैन्य दिसतील अशा ठिकाणी श्रीकृष्ण रथाची स्थापना करतात म्हणजे रथ दोन्ही सैन्यांच्या मध्यभागी उभा करतात, अर्जुन रथात उभा राहून दोन्ही सैन्यांवर नजर फिरवितो दोन्हीकडे अर्जुनाचेच गोत्रज, नातेवाईक दृष्टीस पडतात कौरव व पांडव यांचे युध्द म्हणजे भावाभावांमधील राज्य -

प्राप्तीसाठी केलेले युध्द आहे. यामुळे दोन्हीकडे लढावयास नात्यागोत्यातील लोक असणे स्वाभाविकच आहे. राज्यसुखाच्या प्राप्तीसाठी नातेवाईकांचा नि:पात करुन पापाचा धनी होणे अर्जुनाच्या बुध्दीला पटत नाही. त्यापेक्षा राज्यसुखाचा त्याग परवडला, त्याच्या अंत:करणात गोत्रजांविषयी दयाभाव उत्पन्न झाल्याने त्याच्यातील वीरवृत्ती थंडावते व खेदजनक अंत:करणाने तो कृष्णाशी बोलू लागतो.

' माझेच आप्तजन अति उत्साहाच्या भरात लढण्यासाठी कुरुक्षेत्रावर उपस्थित राहिलेले असले तरी त्यांच्या बरोबर युध्द करणे आपणाला अशोभनीय आहे हे आप्तजन एकमेकांना जीवे मारण्याच्या तयारीत राहिलेले पाहून माझे मन विचलित झालेले आहे. मनामध्ये अनेक प्रश्नांचे काहूर माजलेले आहे अशा अवस्थेत माझे धनुष्यबाण केव्हाच गळून पडलेले आहे. मी आतापर्यन्त अनेक युध्दे केलेली आहेत. अनेक राक्षसाना यमसदनास धाडले पण त्यावेळी माझे मन स्थिर होते. हृदय निश्चल होते. परंतु याक्षणी मात्र माझे हृदय व मन ढिले पडायला लागले आहे. स्वजना-विषयीचा मोह कोमल आहे पण तोडण्यास कठीण आहे. स्वजनांचे मोहकवच तोडण्याचे धाडस माझ्यात नाही.'

स्वजनाच्या वधाच्या कल्पनेने गर्भगळित झालेला अर्जुन चित्रित करुन अर्जुनाच्या व्यक्तिरेखमध्ये स्वत:च्या प्रतिमेचे रंग भरायला ज्ञानदेवांनी सुरुवात केलेली आहे. युध्दाचा परिणाम काय होईल या अनुषंगाने अर्जुनाच्या मनातील विचार मंथन व भावी समाज जीवनाच्यादृष्टीने या युध्दाचे काय परिणाम होतील या विषयीची अर्जुनाची स्पष्ट भूमिका अर्जुनाने श्रीकृष्णा समोर मांडलेली आहे' या युध्दात स्वजनांचा नि:पात होणार म्हणजे कुलक्षय होणार, स्त्रीया विधवा होणार, पुरुषमंडळी नष्ट झाल्याने समाजामध्ये स्वैराचार निर्माण होणार एकूणच समाजजीवनात अनाचार माजणार अशा राज्याचे राज्यसुख भोगणे म्हणजे नरकयातना भोगण्यासारखे आहे. कौरव माझे अनुज आहेत यांचा वध करावयाचा आणि धर्मादी माझे अनुज असूनही त्यांचे संरक्षण करायचे हा कुठला न्याय ? त्यापेक्षा सर्वांनाच का मारायचे नाही ? ' असा युक्तिवादही अर्जुन करतो.

युध्दाविषयी आणि जीवनाविषयी व्यापक विचार करणारा अर्जुन ज्ञानदेवानी चित्रित केल्याने अर्जुनाची व्यक्तिरेखा उद्बोधक झालेली आहे.

जीवनामध्ये शांततेचामार्ग सुखावह ठरतो ,युध्दामुळे फायद्या ऐवजी फार मोठा तोटाच होतो. मनुष्यहानी होते. संपत्तीचे अतोनात नुकसान होते. व्यक्ती - व्यक्तींच्या परस्पर संबंधामध्ये दुरावा निर्माण होतो. समूह जीवनामध्ये अस्वस्थेचे वातावरण निर्माण होते. कौरवपांडवाच्या युध्दासमयी गांधारीच्या हृदयामध्ये झालेली कालवाकालव, दुर्योधन एकदाच मेला परंतु गांधारी शंभरवेळा मेली. शतधा गांधारीचे अंत:करण विदीर्ण झाले. कुरूयुध्दातील भीषणतेपेक्षा गांधीरीसारख्या पतिव्रतेच्या मनातील भावनांचे रणांगण भयावह आहे. शोक - पर्वामध्ये करूणरसाचा जो हलकल्लोळ उडालेला आहे तो या युध्दाची अनावश्यकता व भीषणता पटवून देणारा आहे. अर्जुन अंधारातही आपल्या लक्ष्याचा अचूक अंदाज घेत असे तद्वत भावी जीवनात घडणाऱ्या घटनांचा अचूक अंदाज अर्जुनाने घेतलेला होता.कुलक्षय,स्वैराचार,अनाचार,यासारखी कारणे पुढे करतो व कुलक्षयाच्या पापात आणि स्वजनांच्या रक्तात भिजलेल्या राज्यात आपणाला काय सुख लागणार यापेक्षा युध्दातून अंग काढण्यातच हित आहे असे श्रीकृष्णाला सांगत आहे. परंतु कृष्ण निर्विकार चेहऱ्याने अर्जुनाकडे पाहतच राहतो. प्रत्युत्तर करीत नाही यामुळे अर्जुन आणखी दु:खी होतो.

<u>गुरूजन व वडिलधाऱ्या मंडळीविषयी आदरभाव बाळगणारा अर्जुन</u>

महाभारताच्या युध्दाच्या सुरुवातीला अर्जुनाने आपले पहिले दोन बाण भीष्म व द्रोण यांच्या चरणाजवळ टाकलेले आहेत. भीष्म व द्रोण यांच्याविषयीचा आदरभाव व कृतज्ञता या बाणातून व्यक्त केलेला आहे. असा गुरुजनांविषयी व वडिलधाऱ्यांविषयी अदरभाव बाळगणारा विद्यार्थी धर्म व पुत्रधर्म याचे पालन करणारा अर्जुन ज्ञानदेवांनी चित्रित केलेला आहे. गीताकारांचा अर्जुन श्रीकृष्णाला म्हणतो पूजनास योग्य असणाऱ्या द्रोणाचार्य - भीष्म यांच्याशी बाणाने युध्द कसा करू ? तर ज्ञानदेवाचा अर्जुन म्हणतो की तुम्ही म्हणता ते ठीक

आहे परंतु युध्दाविषयी परत विचार करण्याची आवश्यकता आहे. कुलक्षय अटळच आहे परंतु माझ्या मनात दुसरीच भीती उत्पन्न झालेली आहे. भीष्माचार्यांसारख्या वडिलधाऱ्यांची सेवा करणे हा पुत्रधर्म आहे. हा पुत्र धर्म विसरुन नव्हे बुडवून मी त्यांच्यावर शस्त्र सोडू ?

देवा माता-पितरें अर्चिजती । सर्वस्वे तोषु पावविजती ।
तियें पाठी केवीं वधिजती । आपुलिया हातीं ( २ । ३२ )

द्रोणाचार्य हे माझे गुरु त्यांची चरणसेवा करण्याचे भाग्य लाभले. भीष्म व द्रोणाचार्य याविषयी माझ्या मनात अतिशय कळकळ आहे.

तैसे गोत्रगुरु आमुचे । हे पूजनीय आम्हा नियमाचे
मज बहुत भीष्मद्रोणाचे । वर्ततसे
मी पार्थु द्रोणाचा केला । येणे धनुर्वेद मज दिधला ।
तेणे उपकारें काय आभारैला । वधी तयाते ?
जेथीचिया कृपा लाहिजे वरु । तेथेचि मने व्यभिचारु ।
तरी काय मी भस्मासुरु । अर्जुन म्हणे ( २ । ३४,३७,३८ )

भीष्माविषयीचे प्रेम व्यक्त करणाऱ्या अर्जुनाचे या युध्दामुळे कळवळणारे मन ज्ञानदेवांनी अचूकपणे टिपलेले आहे.

अर्जुनाचे मित्रप्रेम --

श्रीकृष्ण व अर्जुन यांचे संबंध अनेक नात्यागोत्याच्या धाग्यांनी गुंफलेले आहेत. श्रीकृष्ण अर्जुनाचा मामेभाऊ आहेत तर अर्जुन श्रीकृष्णाचा आतेभाऊ आहे. अर्जुनाचा सुभद्राशी विवाह झालेला असल्याने अर्जुन हा कृष्णाचा मेव्हणाही आहे. अर्जुन श्रीकृष्ण रथी सारथी, गुरुशिष्य, देवभक्त, वक्ता, श्रोता, मित्रत्व अशा विविध नात्यांनी संबंधित आहेत. यासर्व नात्यांमध्ये अर्जुन व श्रीकृष्ण यांचे मित्रत्वाचे नाते रंजक, उद्बोधक तितकेच ते अनुकरणीय आहे. ज्ञानदेवांनी श्रीकृष्णार्जुन मित्र - प्रेमाचे रोचक असे चित्रण करुन या व्यक्तिरेखा अधिक टवटवीत केलेल्या आहेत.

श्रीकृष्ण व अर्जुन यांच्यातील विविध नात्याविषयी पु.श्री.कानडे म्हणतात कृष्ण आणि अर्जुन यांच्यातील लौकिक नाते तिहेरी स्वरुपाचे आहे. मित्र आहे आणि शिष्यही आहे. अर्जुनाची हताश अवस्था पाहून त्याने आजवर केलेल्या पराक्रमाची श्रीकृष्ण आठवण करुन देत आहे --

तू शूरवृत्तीचा ठावी । क्षात्रियामाजी रावो ।
तुझिया लाढेपणाचा आवो । तिही लोकी ( २।९ )
तुवा संग्रामी हरू जितिला । निवातकवचाचा ठावो फोडिला
पवाडा तुवा केला । गंधर्वासी (२।१० )
हे पाहता तुझेनी पाडे । दिसे त्रैलोक्यही थोकडे
ऐसे पौरुष चोखडे । पार्था तुझे ( २।११ )" २

श्रीकृष्ण आणि अर्जुन यांचे मित्रत्वाचे लौकिक नाते आहे.याविषयीचा स्पष्ट निर्वाळा कानडे यांनी दिलेला आहे.

श्रीकृष्ण अर्जुनाचा विश्वासू मित्र आहे, अर्जुनाच्या विश्वासाचे बलस्थान आहे. काय करावे आणि काय करू नये ? अशा द्विधा मन:स्थितीत सापडलेला अर्जुन श्रीकृष्णाला आपले सर्वस्व समजतो व या परिस्थितीतून निभावून नेण्याची विनंती करतो. अर्जुन म्हणतो, तरी श्रीकृष्णा तुवा जाणावे । निके ते आम्हा सांगावे ।
जे सखा सर्वस्व आघवे . आम्हासी तू (२।५८)

अंधारामुळे अंधारात असणारी जवळची वस्तू दिसत नाही,याप्रमाणे अर्जुनाच्या मनात भ्रांती उत्पन्न झाल्याने स्वत:चे हित कशात आहे हे समजेनासे झालेले आहे, याकारणे तो आपला जवळचा विश्वासू मित्र या नात्याने कृष्णाकडे सल्ला विचारीत आहे. गीतेतील अर्जुन स्वत:चा श्रीकृष्णाचा शिष्य असा उल्लेख करतो ( ज्ञा.अ.२।७ ) तर ज्ञानदेवाचा अर्जुन श्रीकृष्णाला सखा म्हणजे इष्टमित्र या संबंधाने विचारतो. श्रीकृष्ण अर्जुनाचा गुरू-माता-पिता आहे तद्वत जिवलग मित्रही आहे असे चित्रण ज्ञानदेवानी करुन अर्जुनाच्या मित्रप्रेमाचे अभिनव दर्शन घडविले आहे.

अर्जुनाची जिज्ञासूवृत्ती --

ज्ञानदेवांनी चित्रित केलेल्या अर्जुनाच्या व्यक्तिरेखतून एका जिज्ञासू, ज्ञानपिपासू व ज्ञानप्राप्तीची तळमळ असणाऱ्या आदर्श विद्यार्थ्याचे दर्शन होते. ज्ञानदेवानी चित्रित केलेला अर्जुन आदर्श विद्यार्थ्याचा आदर्श नमुना आहे. श्रीकृष्ण या आपल्या गुरुंविषयी अत्यंतिक आदरभाव बाळगून श्रीकृष्ण जो उपदेश करतात तो तन्मयतेने अर्जुन श्रवण करतो. ज्ञानप्राप्तीची तळमळ ज्याच्याजवळ आहे त्याच्याजवळच जिज्ञासूवृत्ती असते. या जिज्ञासूवृत्तीतून त्याला अनेक प्रश्न पडत असतात. ज्ञानेश्वरीत अर्जुनाने विचारलेले सर्व प्रश्न अर्जुनाच्या जिज्ञासू वृत्तीचे गमक आहेत. अर्जुनाच्या जिज्ञासूवृत्तीचे ज्ञानदेवानी सुरेख वर्णन केलेले आहे ते म्हणतात की ` कृष्णाने अगोदर सांगितलेला अभिप्राय लक्षात घेऊन पुढे काय सांगणार आहे यावर ध्यान ठेऊन अर्जुनाने प्रश्न विचारला `.

अर्जुनाच्या या जिज्ञासूवृत्तीबद्दल श्रीकृष्णानी ज्ञानेश्वरीत अनेक ठिकाणी कौतुक केलेले आहे. श्रीकृष्णानी सांगितलेला योगमार्ग ऐकून या योगमार्गाविषयीचे अर्जुनाचे कुतूहल आणखी वाढले. या योगमार्गाचा अभ्यास सर्वसामान्यांनाही करता येईल का ? असा सवालही त्याच्या जिज्ञासूवृत्तीतून निर्माण झालेला आहे. या जिज्ञासूवृत्तीतून योगमार्गाची अनुभूती यावी अशी तळमळही अर्जुनाच्या मनात निर्माण झाली. अर्जुन श्रीकृष्णांचे योगमार्गातील सर्व स्पष्टीकरण एकाग्रचित्ताने ऐकून घेतो. परंतु योगमार्गातील सप्तपदांचा अर्थबोध न झाल्याने तो परत ऐकावा अशी विनंती करतो.

> एऱ्हवी अवधानाचेनि वहिलेपणे । नाना प्रमेयाची उगाने
> काय श्रवणाचेनि आंगवणे । बोलो लाहती `
> अर्थाची चाड मज आहे । ते सांगताही वेळु न साहे ।
> म्हणोनि निरूपण लवलाहे । कीजो देवा ( ७ । १९८, २०१ )

अर्जुनाची जिज्ञासूवृत्ती व ज्ञानप्राप्तीची तळमळ या ठिकाणी व्यक्त झालेली आहे.

अर्जुनाची श्रीकृष्णाविषयीची नम्रबुध्दी --

अर्जुन व श्रीकृष्ण यांचे नाते अनेकपदरी आहे. अर्जुनही श्रीकृष्णाशी वैवध्यपूर्ण नाते संबंधाने वागत असे. युध्दापूर्वी अर्जुन कृष्णा बरोबर ,बरोबरीच्या नात्याने वागलेला आहे. परंतु युध्दसमयी अर्जुन कृष्णाशी अत्यंत नम्रतेने वागत आहे. श्रीकृष्ण हेच अर्जुनाचे सर्वस्व आहे हे महाभारतातून सिध्द होते. ज्ञानदेवानी ज्ञानदेवीत मात्र अर्जुनाची श्रीकृष्णाविषयी असणारी नम्रबुध्दी व नम्रतापूर्वक वर्तणूक याचे चित्रण केल्याने अर्जुनाची व्यक्तिरेखा उजळून निघालेली आहे.

अर्जुनाच्या श्रोतेपणावर आणि भक्तीवर लुब्ध होऊन श्रीकृष्ण जेव्हा भावविवश होऊन अर्जुनाची स्तुती करतात तेव्हा चांगल्या अर्थाने, ती स्तुती सहन न होऊन अर्जुन देवाची स्तुती थांबवून श्रीकृष्णाचे गुणगाण करायला लागतो. श्रीकृष्णाविषयी अर्जुनाची नम्रबुध्दी अनेक प्रसंग चित्रातून ज्ञानदेवानी चित्रित केलेली आहे. अनेक दृष्टांत उपमा ,अलंकारातून श्रीकृष्णाचे महत्व अर्जुनाने व्यक्त केलेले आहे. ज्ञानयज्ञाने परमेश्वराची प्राप्त होते हे कृष्णानी चौथ्या अध्यायातील (३३ ते ४२ ) या श्लोकांमध्ये सांगितले आहे. याची आठवण श्रीकृष्णानी अर्जुनाला करुन दिलेली आहे. परंतु मागे सांगितले आहे आता त्याची काही गरज नाही असे अर्जुन म्हणत नाही,तो म्हणतो, तव आथि जी अर्जुन म्हणे । हे दैविक्रिया प्रसादाचे तरणे । तरि काय अमृताचे आरोगणे । पुरे म्हणावे ? ( ९ ॥ २३० )

तो आपला कृपाप्रसादच आहे परंतु अमृताचे भोजन मिळाले असता ` पुरे ` म्हणवेल काय ? अर्जुनाच्या श्रवणाउत्सुकतेचा श्रीकृष्णाला आनंद वाटतो व आनंदाच्या भरातच डोलायला लागतात. आणि म्हणतात तुझी श्रवण उत्सुकताच बोलावयास भाग पाडते. यावेळी अर्जुनाने श्रीकृष्ण व आपली जी तुलना केलेली आहे या तुलनात्मक वर्णनातून अर्जुनाची श्रीकृष्णाविषयी असणारी नम्रबुध्दीच अभिव्यक्त झालेली आहे याचे ज्ञानदेवानी काव्यात्मक असे चित्रण केलेले आहे.

तव अर्जुन म्हणे हे कायी । चकोरेवीण चांदणेची नाही ?
जगचि निवविजे हा तयाच्या ठायी । स्वभावो की जी
येरे चकोरे तिये आपुलिये चाडे । चांचू करिती चंद्राकडे ।
तेव्हीं आम्ही विनवू ते थोकडे । देवो कृपासिंधु ।।
जी मेघु आपुलिये प्रौढी। जगाची आर्ती दवडी ।
वाचूनी चातकाची तहान केवढी । तो वर्षावी पाहूनी ?
परि चुळा एकाचिया चाडे । जेवी गंगेतेचि ठाकणे पडे ।
तेवी आर्त बहु का थोडे । तरी सांगावे देवे ( ९ । २३३ ते ३६ )

श्रीकृष्णानी अर्जुनाच्या श्रोतृत्वाची स्तुती एकून अर्जुनाच्या मनामध्ये श्रीकृष्णाविषयी जो नम्रभाव निर्माण झालेला आहे त्याचे ज्ञानदेव स्वत:च काव्यात्मक असे चित्रण करतात त्यामुळे मुळ गीतेतील अर्जुनापेक्षा ज्ञानदेवीत अर्जुन अधिक सजीवत्वाचा प्रत्यय देतो.

अर्जुनाचे गुरुप्रेम --

ज्ञानेश्वरीमध्ये गुरुभक्ती,गुरुप्रेम व गुरुसामर्थ्य याविषयी अनेक ओव्या ज्ञानदेवानी लिहिलेल्या आहेत. श्रीकृष्ण हे अर्जुनाचे गुरु आहेत हे दुसऱ्या अध्यायात स्पष्ट झालेले आहे ( २ । ५९ ) अर्जुनाने श्रीकृष्णाचा गुणानुवाद अनेकाच्या मुखातून ऐकलेला आहे परंतु श्रीकृष्णाचीच कृपा नसल्याने श्रीकृष्णाच्या गुणानुवादाचे आकलन अर्जुनाला झालेले नाही. गीताप्रसंगाच्या समयी अर्जुनाचे श्रीकृष्णावर अत्यंतिक असे प्रेम असल्याने श्रीकृष्णाची अर्जुनावर कृपा होऊन अर्जुनाला न समजलेला श्रीकृष्णाचा गुणानुवाद समजलेला आहे. विद्यार्थ्याच्या मनात गुरुविषयी आदरभाव असेल तर गुरुकृपा होते. गुरुकृपेशिवाय केलेले अध्ययन फलद्रुप होत नाही ( ९।ते ६८, ७२ )

आपल्यावर गुरुकृपा झालेली आहे याची कल्पना येताच अर्जुन कौतुकाने नाचायला लागतो याचे चित्रात्मक असे वर्णन ज्ञानदेव करतात --

ए-हवी वडिलवडिलांचेनि मुखे । मी सदा तूते कानी आइके ।
परि कृपा न कीजेचि तुवा एके । नव नेणवेचि काही ।।
ऐसिये जालिये प्रतीतीचेनि माजे । अर्जुन निश्चयाचि नाचतुःसे भोजे ।
तेवीचि म्हणे देवा तुझे । वाक्य मज मानले ( १० । १६७, १७३ )

गीतेतील अर्जुन श्रीकृष्णाच्या उपदेशाने संतुष्ट होऊन नाचत नाही, परंतु ज्ञानदेवानी मात्र गुरुकृपेच्या कल्पनेने संतुष्ट होऊन नाचणारा अर्जुन कलात्मकरीतीने चित्रित केलेला आहे, त्यामुळे ज्ञानदेवीतील अर्जुनाची व्यक्तिरेखा चित्त आकर्षित करते.

आत्मपरीक्षण करणारा अर्जुन --

दहाव्या अध्यायात श्रीकृष्णाची विविध ईश्वरी रुपे ऐकल्यानंतर ही ईश्वरी रूपे प्रत्यक्षात पहावीत अशी उर्मी निर्माण झाल्यानंतर गीतेतील अर्जुन श्रीकृष्णाला म्हणतो हे परमेश्वरा तू वर्णन केलेले तुझे ईश्वरी स्वरूप अगदी बरोबर आहे. परंतु ते ईश्वरी स्वरूप पाहण्याची पात्रता माझ्या अंगी असेल तर ते विश्वरूप मला दाखवा ( अ.११ ।श्लोक ३ ते ४ ) हा अर्जुन स्वत:ची पात्रता तपासणारा नाही. मला विश्वरूप पाहणे शक्य आहे असे तुम्हाला वाटत असेल तर दाखवा असे म्हणतो .या त्याच्या वक्तव्यावरून तो कृष्णाला अडचणीत आणीत आहे असे वाटते .ज्ञानेश्वर प्रतिभाशक्तीने स्वत:ची पात्रता तपासून घेणारा अर्जुन चित्रित करता त्यामुळे गीतेतील अर्जुनापेक्षा ज्ञानदेवांची अर्जुन ही व्यक्तिरेखा अधिक बोलकी व सुज्ञ वाटते. ज्ञानेश्वर म्हणतात विश्वरूप विचारण्याकडे दृष्टी ठेवून अर्जुन प्रथम श्रीकृष्णाशी बोलण्याचा उपक्रम कसा करतो ते ऐका --

मी जरी सलगीचा चांगु । तरी काय आइसीहूनि अंतरंगु ।
परी तेही हा प्रसंगु । बिहाली पुसो
माझी आवडे तैसी सेवा जाहली । तरी काय होइल गरुडाचियायेतुली ?
परी तोही हे बोली करी चिना
मी काय सनकादिकांहूनि जवळा । परी तयाही नागवेची हा चाळा ।

मी आवडेन काय प्रेमळा । गोकुळीचिया ऐसा
तयातेही लेकुरपणे झाकविले । एकाचे गर्भवासही साहिले ।
परी विश्वरूप हे राहविले । न दावीच कवणा
हा ठायवरी गुज । याचिये अंतरीचे हे निज
केवी उराउरी मज । पुसो ये पा ? ( ११.३१ ते ३६ )

प्रथम अर्जुनाने आपली योग्यता तपासलेली आहे. लक्ष्मी अर्धांगी असूनही विश्वरूप दाखवा म्हणायला घाबरली. गरूड वाहन असूनही त्याने विश्वरूपाविषयी विचारलेले नाही. गोकुळातील लोकांनीही विश्वरूपासंदर्भात विचारलेले नाही. लेकरू आहे अशी समजूत करुन त्यांना फसविले. अंबरषी साठी गर्भवास सहन केला परंतु कोणालाही विश्वरूप दाखविलेले नाही. विश्वरूप दाखवा असा आग्रहही कोणी केलेला नाही. तेव्हा श्रीकृष्णाच्या मनात काय आहे याचा अंदाजही कोणाला नाही म्हणून अर्जुन भीत भीत का होईना विश्वरूप दाखवा असे म्हणतो. श्रीकृष्णाविषयी असणारी आदरयुक्त भीती अर्जुनाच्या हालचालीतून दिसून येते. विश्वरूप पाहण्याची मनावर ओढ राहवत नाही.

आणि न पुसेचि जरी म्हणे । तरी विश्वरूप देखिलियाविणे
सुख नोहेचि परी जिणे । तेही विपाये ( ११.३७ )

स्वत:च्या कुवतीचा अंदाज घेऊन विश्वरूप पाहण्याची इच्छा प्रदर्शित करणारा ज्ञानदेव चित्रित अर्जुन उद्‌बोधक आणि रंजक वाटतो. श्रीकृष्णाला इतर प्रश्न विचारण्यास न घाबरणारा अर्जुन मात्र या ठिकाणी घाबरतो .अर्जुनाच्या व्यक्तिमत्वातील प्रसंगानुरूप वागण्याचे भान ज्ञानदेवानी दर्शविलेले आहे.

अर्जुनाचे प्रश्न विचारण्याचे कौशल्य --

अर्जुनाने श्रीकृष्णाला विचारलेले प्रश्न सर्वसामान्य लोकांच्या दृष्टीने अनिवार्य आहेत. यामुळे अर्जुन सर्वसामान्यांचा प्रातिनिधिक नमुना वाटतो. अर्जुन कौशल्यपूर्ण व

जिज्ञासूपणाने कृष्णाला प्रश्न विचारतो, प्रश्न विचारण्यासाठी जी कारणे कारणीभूत ठरलेली आहेत त्यांचीही कारणमीमांसा करतो आणि श्रीकृष्णालाच हा प्रश्न का विचारतो याची कारणमीमांसाही करतो. सर्वसामान्यांना पडणारे प्रश्न अर्जुन मुखातून ज्ञानदेवानी उपस्थित केल्याने श्रीकृष्णार्जुन संवादाला लैाकिक स्वरूप प्राप्त झालेले आहे. यामुळे श्रीकृष्णार्जुनाचे लैाकिक नाते अधिक उदबोधक होत गेलेले आहे.

अर्जुनाने देवाला कसा प्रश्न विचारला या अर्जुनाच्या प्रश्न विचारण्याच्या कैाशल्या संदर्भात ज्ञानदेव म्हणतात पण तो अशा खुबीने बोलला की एकदोन शब्दातच आपणाला सर्व विश्वरूप झाडून दाखवावे.

अहो वासरू देखिलियाचिसाठी । धेनु खडबडोनि मोहे उठी ।
मग स्तनामुखाचिने मेटी । काय पान्हा धरे
पाहा पा तया पांडवाचेनि नावे । जो कृष्ण रानाही प्रतिपाळू यावे ।
तयाते अर्जुने जव पुसावे । तव साहील काई ( ११ । ४० -- ४१ )

श्रीकृष्णाचे स्थितप्रज्ञाचे वर्णन ऐकून अर्जुन जे प्रश्न करतो यावरून अर्जुन सर्वसामान्याचा प्रतिनिधिक नमुना आहे हे सिध्द होते. ज्ञानेश्वर म्हणतात या

बोला पार्थे । म्हणितले सांग पा कृष्णाते ।
काय म्हणिपे स्थितप्रज्ञाते । वोळखो केवी
आणि स्थिरबुध्दि जो म्हणिजे । तो कैसिया चिन्ही जाणिजे ।
जो समाधिसुख भुंजि । अखंडित
तो कवणे स्थिती असे । कैसेनि रूप विलसे ।
देवा सांगावे हे ऐसे । लक्ष्मीपती ( २।२८७ ते २८९ )

अर्जुन हा असामान्यापैकी असता तर त्याने स्थिरप्रज्ञाविषयी प्रश्न विचारले नसते स्वत: त्या प्रश्नाचा शोध घेतला असता.

अर्जुनाने श्रीकृष्णासमोर प्रदर्शित केलेल्या इच्छेवरून अर्जुन सर्वसामान्यांचा

प्रतिनिधी आहे हे स्पष्ट होते. श्रीकृष्णाने धारण केलेले विश्वरूप खरे की खोटे याविषयी श्रीकृष्णाचे मत जाणून घेण्याची इच्छा आणि परमेश्वर प्राप्तीचा योगमार्ग ( ज्ञानयोग ) चांगला की भक्तिमार्ग ( सगुणभक्ती ) चांगला याविषयी श्रीकृष्णाला केलेली विचारणा अर्जुनाच्या सर्वसामान्यत्वाची द्योतक आहेत (२ । २८ ते ३३ )

अर्जुनाने प्रश्न विचारण्याचे जे कौशल्य आहे. जे चातुर्य आहे याविषयी ज्ञानदेवानी कौतुक केलेले आहे. परंतु श्रीकृष्णानी अर्जुनाच्या प्रश्नविचारण्याच्या कौशल्याचे कौतुक केलेले आहे असे ज्ञानदेवानी चित्रित केलेले आहे.

हा किरीटीचिया बोला । तो जदर्बंधु संतोषला
म्हणे हो प्रश्नु मला । जाणसी करू ( १२ । २४ )

<u>चिकित्सकवृत्तीचा अर्जुन --</u>

देवाने जे विश्वरूप साक्षात प्रगट केले या विश्वरूपाचा आपल्यावर काय काय परिणाम झाला आहे याची चिकित्सा अर्जुनाने केलेली आहे, तो श्रीकृष्णाला म्हणतो, ' मला जे विश्वरूप पाहण्याविषयीचे डोहळे लागले होते ते माझे मलाच फळले म्हणायचे. विश्वरूप पाहून डोळ्यांची शांती व्हायला पाहिजे होती परंतु डोळ्यांची शांती न होता मरणाचे भय मात्र उत्पन्न झालेले आहे .माझ्या देहाची मला पर्वा नाही परंतु माझे चैतन्यच जिवंत राहीले की नाही याचाच भरवसा नाही.आणखी विश्वरूप दर्शनाने भीती उत्पन्न होऊन शरीर थरथर कापत आहे. परंतु ज्याला अमर म्हणतात अशा आत्म्यालाही मरण्याची भीती पडलेली आहे याला विश्वरूपाचा साक्षात्कार म्हणायचा काय ? ( ११ । ३६५ ते ७२ )

बाप साक्षात्काराचा वेधु । कैसा देशधडी केला बोधु ।
हा गुरुशिष्यसंबंधु । विपाये नांदे
देवा तुझ्या या दर्शनी । जे वैकल्य उपजले आहे अंत:करणी
ते सावरावयालागी गवसणी । धैर्याची करितसे ( ११ । ३७० -- ७१ )

अर्जुन आपल्या अवस्थेविषयी म्हणतो ,

> जीव विसंवावयाचिया चाडा । सैंघ धावाधावी करितसे बापडा ।
> परि सोयही कवणेकडा । न लगे एथ ।
> ऐसे विश्वरूपाचिया महामारी ।जीवित्व केले आहे चराचरी ।
> जी न बोले तरि काय करी । कैसेनि राहे ( ११ ।२७३ — ७४ )

देवाने अर्जुनाला धीर दिलेला आहे. अर्जुना हे सर्व जग मी गिळंकृत करणार आहे परंतु पांडव फक्त जिवंत राहणार आहेत. श्रीकृष्णाच्या या आश्वासनाने अर्जुनाला खूप धीर येतो परंतु नंतर तो धीटपणे श्रीकृष्णाला प्रतिप्रश्न करतो की --

> ना तरी अर्जुना मी काळू । आणि ग्रासिजे तो माझा खेळु ।
> हा बोलु तुझा कीर आढळु । मानू आम्ही ( ११ । ४९१ )

देवा तुम्ही जे म्हणता की मी काळ आहे व जग ग्रासने हा माझा खेळ आहे हे मला पटत नाही.कारण जग आता उत्पत्तीच्या अवस्थेतून विकासाच्या अवस्थेकडे चाललेले आहे तेव्हा पदार्पणातच निवृत्ती असंभव आहे. जगाची विकासाची अवस्था असल्याने नाश करण्याचा तुमचा विचार अवास्तव आहे. अर्जुनाने पुढे जे श्रीकृष्णाला प्रश्न विचारलेले आहेत ते अर्जुनाच्या चिकित्सक बुध्दीचे दर्शक आहेत.` तरुणपणातच म्हातारपण येते का ? मरद्दुपारी सूर्यास्त होतो का ? (११ । ४९१ — ९२ )

अर्जुनाचा प्रामाणिकपणा --

विश्वरूप पाहून झाल्यानंतर अर्जुनाच्या चेहऱ्यावरील आनंदाच्या छटा नष्ट होऊन तो हिरमुसल्यासारखा झालेला आहे.आपण फार मोठा गुन्हा केलेला आहे याची प्रामाणिकपणे स्पष्ट कबूली देत आहे.

> परि ऐसिया तूते स्वामी । कहीच नेणोजी आम्ही ।
> म्हणोनि सोयरे संबंधधर्मी । राहटलो तुजसी
>
> तू योगियांचे समाधिसुख । कैसा जाणोचिन । मी मूर्ख ।

उपरोधु जी सन्मुख । तुजसी कऱू ( ११। ५३७, ४३ )

अर्जुन स्वत:ला मूर्ख समजतो व मूर्खपणाचा पराक्रम काय काय केला तो सांगतो नातेवाईकांच्या संबंधाने विनोदाने बोललो, तुमच्या बरोबरीचा मान मागितला, शहाणपणाच्या घमेंडीने तुझ्याशी अबोला धरला , दांडपट्टा, सोंगटया, कुस्ती, खेळलो, तुझा धिक्कार करुन तुझ्याबरोबर झोंबाझोंबी केली. तुम्हालाच शहाणपण शिकविण्याचा प्रयत्न केला अर्जुन आपल्या सर्व अपराधाची झाडाझडती घेऊन श्रीकृष्णाला म्हणतो --

म्हणौनि काय आता । निवेदिजेल अनंता ।
मी राशी आहे समस्ता । अपराधांची
तरी आता अप्रमेया । मज शरणागता आपुलिया ।
क्षमा कीजो जी यया । अपराधांसि ( ११ । ५५५, ५६० )

याप्रमाणे बोलून अर्जुनाने श्रीकृष्णास साष्टांग नमस्कार केला. त्यावेळी त्याच्या ठिकाणी अष्टसात्त्विक भावाचे भरते आले. मग गहिवरुन म्हणू लागला ' प्रसन्न व्हा प्रसन्न व्हा व मला अपराधरुपी समुद्रातून बाहेर काढा , तू सगळ्या जनांचा आवडता असतानाही आमचा एक नातेवाईक आहेस असे समजून आम्ही तुझा मान कधी राखला नाही, तुम्ही सर्व जगाचे ईश्वर आहात असे कोणी म्हटले तर उलट आम्ही आश्चर्य करीत असू, आम्हीच तुमचे वर्णन करणे योग्य असतानाही प्रेमाने सभेमध्ये जो जो तुम्ही माझे वर्णन करावे जो तो मी गर्वाने फुगून जाऊन अधिका-अधिकच बडबड करीत असे अशा माझ्या हातून घडलेल्या अपराधाना सीमा नाही. आपण या सगळ्या अपराधांपासून माझे रक्षण करा. देवा ही विनंती करण्याची योग्यताही माझ्या अंगी नाही पण लहान मूल जसे बापाशी लडिवाळपणे बोलते त्याप्रमाणे मी आपल्याशी लडिवाळपणे बोलत आहे ( ११ । ५६७, ७२ )

अर्जुनाच्या प्रामाणिकपणाबरोबर त्याचा बालबोध स्वभाव ही चित्रित करुन अर्जुनाची व्यक्तीरेखा अधिक बोलकी केलेली आहे.

अर्जुनाचे श्रोतृत्व --

अर्जुन हा गीताश्रवणाचा अधिकारी होता.अर्जुनाच्या मनाची एकाग्रता विलक्षण होती तो तन,मन एक करुन गीतेचे श्रवण करीत होता.श्रीकृष्ण अर्जुनाला स्पष्टपणे सांगताहेत की अर्जुना माझी सर्व रहस्ये मी तुला एकट्यालाच का सांगतो ? अशी शंका तुझ्यामनात येणार परंतु अशी कुशंका मनात येऊ देऊ नको कारण तू चांगल्या मनाचा व शुध्दबुध्दीचा श्रोता आहेस तुझ्या उच्चप्रतीच्या श्रोतेपणापोटी मी सारी गुपिते तुला सांगितलेली आहेत.

अर्जुनाच्या जिज्ञासू वृत्तीबद्दल कृष्णाने वारंवार प्रशंसोद्‌गार काढलेले आहेत. मूळ भगवद्‌गीतेतील व्यासांच्या अर्जुनाने न विचारलेले अनेक प्रश्न ज्ञानदेवांच्या अर्जुनाने विचारले आहेत. त्याबद्दलचे समाधान कृष्णाने व्यक्त करुन अर्जुनाच्या मर्मग्राही बुध्दीचा गौरव केला आहे. आपल्या वक्तृत्वाचे ग्रहण करण्यास अतिशय योग्य असा श्रोता मिळाला हे कृष्णाचे उद्‌गार चौदाव्या अध्यायात आलेले आहेत.

> मग म्हणे गा प्रज्ञाकांता । उजवली आजि वक्तृत्वता ।
> जे बोलायेवढा श्रोता । जोडलासि ( १४ । ६३ । ) [३]

आदर्श शिष्य अर्जुन --

गुरु आणि शिष्याचे नाते पवित्र असते. गुरु व शिष्यांच्या मनात एकमेकां-बद्दल पराकोटीचा आदरभाव व आत्मिक ओढ असते.अर्जुन हा श्रीकृष्णाचा शिष्य होता,त्याबरोबरच तो द्रोणाचार्यांचा शिष्य होता. दोन्ही गुरुविषयी निरामय भक्ती व सेवा करणारा अर्जुन हा आदर्श शिष्य होता. या आदर्श शिष्याचे आपल्या गुरुविषयी असणारे मनोगत ज्ञानदेव अर्जुनमुखातून व्यक्त करतात असे जे देवा तुम्ही माझे गुरुस्थान की ज्याच्या सहाय्याने माझे अद्वितीय एकपण प्रकट झाले व म्हणूनच ज्याच्याविषयीच्या आदराने तो अद्वैतबोधही बाजूस सारुन ज्याच्या दर्शनाची इच्छा होते व ज्याच्या कृपेने आपले असलेले ब्रह्मत्व आपल्यास पटून कृताकृत्यांचे सर्व ओझे नाहीसे होते व या खऱ्या कृतज्ञतेचे चिन्ह म्हणजे अशा गुरुमाऊलीची

नि:सीम सेवा करणे एवढेच कर्तव्य भक्ताला उरते.

गंगा सिंधु सेवू गेली । पावतांचि समुद्र जाली ।
तेवी भक्ता सेल दिधली । निजपदाची
तो तू माझा जी निरूपचारू । श्रीकृष्ण सख्या सदगुरू ।
मा ब्रह्मतेजा उपकारू । हाचि मानी ।।
जे मज तुम्हा आड । होते भेदाचे कवाड ।
ते फेडोनि केले गोड । सेवासुख
(१८। १५६२ ते १५७४)

या अर्जुनाच्या भावनामय भाषणाने देव भावविवश होऊन म्हणाला

यया अर्जुनाचिया बोला । देवो वाचे सुखे भुलला ।
म्हणे विश्वफळा जाला । फळ हा मज ( १८। १५७६ )

विश्वात अत्यंत मोठी फलप्राप्ती जर कोणती असेल तर असा अर्जुनासारखा आदर्श शिष्य मिळणे होय

अर्जुन हा आदर्श विद्यार्थी आहे हे डॉ.इंदापूरकर यांनी साधार सिध्द केलेले आहे.[66] श्रीकृष्ण हा जसा आदर्श शिक्षक आहे त्याप्रमाणे अर्जुन हाही आदर्श विद्यार्थी आहे. श्रीकृष्णासारख्या आदर्शभूत शिक्षकाच्या अत्यंत सुयोग्य विद्यार्थी होण्यास तो सर्वथैव पात्र आहे. आदर्श विद्यार्थ्याचे सर्व प्रथम लक्षण होय.अर्जुनाने श्रीकृष्णावरील ही श्रद्धा अनेकवेळा व्यक्त केलेली आहे. नमुन्यादाखल एकच उदाहरण पाहू --

देवा तुज ऐसा निजगुरू । आणि आर्तीधणी का न करू ।
एथ मीह कवणाची धरू । तू मात्र आमुची की जे ।।
जरी चिंतामणी हाता चढे । तरी वांछेचे कवण सांकडे ।
का आपुलेनि सुखाडे । इच्छावे जा ।।

देखे अमृतसिंधुते ढाकावे । मग ताहाना जरी फुटावे ।
तरी साथासु का करावे । मागीले ते ।।
तैसा जन्मांतरी बहुती । उपासिता लक्ष्मीपती ।
तू दैव आजि हाती । जाहलासी तरी
तरी आपुलिया सवेसा । का न मगावासि परेशा ।।
देवा हा सुकाळु मानसा । पाहला असे (उ.२१.२६)

मात्र अर्जुनाची गुरूवर अंधश्रध्दा नाही श्रीकृष्णासारखा परमात्म गुरू असूनही तो जे म्हणेल त्या समोर समजता न समजता मान तुकविण्याची अर्जुनाची प्रवृत्ती नाही कृष्णाचे बोलणे दव्यर्थी किंवा शंकास्पद वाटले तर तसे उघडपणे सांगायला तो मुळीच मागेपुढे पाहात नाही. तिसऱ्या, चौथ्या व पाचव्या अध्यायात अगदी सुरुवातीला प्रश्न विचारताना अर्जुनाने आपले जे विचार मांडलेले आहेत त्यावरुन ही गोष्ट स्पष्ट होते. उदाहरणादाखल पाचव्या अध्यायातील संन्यस कर्मणा कृष्ण अशी पृच्छा करताना ज्ञानेश्वरांचा अर्जुन श्रीकृष्णाला सरळ म्हणतो की तुमच्या बोलण्यात मला बिलकुल एकवाक्यता दिसत नाही. तुम्ही कर्मत्याग करावा आणि कर्मयोगही आचरावा असे दुटप्पी बोलता, त्यामुळे माझ्यासारख्या अल्पसमजुतीच्या लोकाना नीट उलगडा होत नाही तरी तुम्ही आपले विचार असंदिग्ध मार्गेत सांगू नका (५.१-५)[११४]

समारोप --

ज्ञानेश्वरीमध्ये ज्ञानेश्वरांनी चित्रित केलेल्या सर्व व्यक्तिरेखांमध्ये अर्जुनाची व्यक्तिरेखा अधिक प्रभावशाली वाटते. ज्ञानेश्वरांच्या प्रतिभाशक्तीचे सामर्थ्य अर्जुनाच्या व्यक्तिचित्रणातून जाणवते. श्रीकृष्णाच्या संवादातून अर्जुनाचे श्रीकृष्णाशी असणारे विवाधांगी नाते चित्रित झालेले आहे. या नातेसंबंधाच्या चित्रणातून अर्जुनाची व्यक्तिरेखा साकारते. अर्जुनाच्या संवादातून अर्जुनाच्या मनातील श्रीकृष्णाविषयी प्रेम, आदरभाव, भक्ती, नम्रता आत्मियता, कळवळा इत्यादी मानवी भावभावनांचे दर्शन घडते त्यामुळे हा व्यक्तिरेखेला अधिक तेज प्राप्त झालेले आहे.

युध्दारंमापूर्वी युध्द करणार नाही अशी भूमिका अर्जुन घेतो.युध्दा समयी भावविवशता अप्रासंगिक असल्याने अर्जुनाच्या भूमिकेत बदल घडवून आणण्यासाठी श्रीकृष्ण अर्जुनाला गीता कथन करतात. अर्जुनाला पचनी पडेल तेव्हढाच आत्मबोध करीत करीत अर्जुनाच्या भूमिकेत परिवर्तन घडवून त्यास युध्दास प्रवृत्त करतात.अर्थात अर्जुनाच्या मनोवृत्तीतील बदल तडफाफडकी नाही ,तडकाफडकी बदल फक्त कायद्यात होतात. अर्जुनाच्या मनात ज्या म्हणून शंका होत्या त्याचे समर्पक असे निरसन कृष्णाकडून करुन घेतले. श्रीकृष्णाने केलेला आत्मबोध चित्तात प्रतिबिंबित झाल्यानंतर अर्जुनाने म्हटले आहे की --

> तरी आता तुझी आज्ञा । सकळ देवाधिदेवराज्ञा ।
> करीन देईं अनुज्ञा । मलतियेविषयी ( १८ । १७७५ )

तू वाटेल ती आज्ञा कर ती करीन ।

ज्ञानदेवीतील अर्जुनाने विचारलेले प्रश्न सामान्यांच्या जीवनाशी निगडित असल्याने ज्ञानदेवांचा अर्जुन सर्वसामान्याचा नमूना म्हणून पहावयास मिळतो. ज्ञानदेवांच्या अर्जुनामुळे गीतेतील अर्जुन आणि आपल्यातील अर्जुन यांचे नातेसंबंध जुळतात. भावनेपेक्षा कर्तव्य श्रेष्ठ नाही आणि कर्तव्यापेक्षा भावना श्रेष्ठ नाही. भावना आणि कर्तव्य यांच्या समन्वयातूनच मानवी जीवन पुढे जात असते.भावनेच्या ठिकाणी कर्तव्य व कर्तव्याच्या ठिकाणी भावना अशी अदलाबदल झाल्यास व्यक्ती जीवनाचा विनाश होतो याचे उत्तम उदाहरण म्हणजे धृतराष्ट्र आहे. भावनाप्रसंगी भावना प्रदर्शित करुन कर्तव्याप्रसंगी कर्तव्य दक्षता दर्शवून जीवनामध्ये आनंद प्राप्ती करता येते हेच ज्ञानदेवांनी अर्जुनाच्या व्यक्तिचित्रणाच्या संदर्भातून सांगितलेले आहे.

## संदर्भ


१ डॉ.चित्राव सिध्देश्वरशास्त्री , "प्राचीन चरित्र कोश", प्रथम खंड, १९६८, पृ.६५

२ कानडे मु.श्री., "ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानदेवी", मधील "ज्ञानदेवांचा अर्जुन" हा लेख, पृ.१५२

३ -- तत्रैव -- पृ.१५४-५५

४ डॉ.इंदापूरकर चं.द. "महाराष्ट्र मराठी अध्यापक त्रैमासिक," ज्ञानेश्वरी आणि शिक्षण विशेषांक, मधील "ज्ञानेश्वरी शैक्षणिक विचारांचा महान - आधार ग्रंथ" हा लेख, वर्ष १२, अंक-१, सप्टेंबर, १९९२, पृ.१० .